**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१७६/२०२२ मधील आदेश निशाणी क्र.१**

**( उत्तम शंकर चव्हाण वि. जतिन संजय म्हसे )**

**CNR-MHRG070006152022**

फिर्याद व फिर्यादीचे सत्यापण वाचले. फिर्यादीने दाखल केलेल्या दस्तऐवजांची पडताळणी केली. फिर्यादीच्या विधीज्ञांचे म्हणणे ऐकले. प्रथमदर्शनी असे दिसते की, आरोपीने फिर्यादीला धनादेश जारी केलेला आहे. सदरहू धनादेश न वटविता परत आलेला आहे. फिर्यादीने आरोपीला कायदेशीर नोटीस पाठवून धनादेशाच्या रक्कमेची मागणी केली आहे; परंतु आरोपीने सदरहू रक्कम विहीत कालावधीमध्ये फिर्यादीला दिलेली नाही. फिर्यादीने ही फिर्याद कायद्याप्रमाणे मुदतीत दाखल केलेली आहे. एकंदरीत, अवलोकन केले असता असे आढळून येते की, प्रथम दर्शनी धनादेश पराक्रम्य संलेख अधिनियमाचे कलम १३८ प्रमाणे गुन्हा घडलेला आहे. म्हणून, माझ्या मते,धनादेश पराक्रम्य संलेख अधिनियमाचे कलम १३८ प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०४ नुसार आदेशीका काढण्याकरिता सदरहू खटल्यात सर्व बाबी दिसून येत आहेत. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

०१. आरोपीविरुध्द धनादेश पराक्रम्य संलेख अधिनियमाचे कलम १३८ अंतर्गत आदेशीका काढण्यात येते.

०२. फिर्यादीने आदेशीका शुल्क नियमाप्रमाणे भरावे, व आरोपीविरुध्द काढण्यात येणा–या संमन्सला जोडण्यासाठी फिर्यादची एक नक्कल सदरहू आदेश पारीत झाल्यापासून तीन दिवसांच्या आत न्यायालयात दाखल करावी.

दिनांकः २८/०७/२०२२

**(सौ. सुजाता रा. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कर्जत, जि.रायगड.